# डोंबिवली वाहतूक उप विभागाचे हद्दीत निर्गमित करण्यात आलेली वाहतूक नियंत्रण अधिसूचना


महाराष्ट्र पोलीस

सद्रक्षणाय खलनिग्रहणाय

पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर

तीन हात नाका, एल.बी.एस. मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)

दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६

Email ID – cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in


जा.क्र. पोउपआ/वावि/अधिसूचना/ २२८ /२०२५ दि. ०६ /१०/२०२५

## –: वाहतूक नियंत्रण अधिसुचना :–

**ज्याअर्थी,** डोंबिवली वाहतूक उपविभागाचे हद्दीत लो.टिळक रोड वरील ताई पिंगळे चौक ते मदन ठाकरे चौक, फडके रोड दरम्यान रस्त्याचे कॉक्रीटिकरणाचे काम दिनांक ०७/१०/२०२५ रोजी पासुन करण्यात येणार आहे. सदर काम करतेवेळी सदर परिसरात वाहतूक कोंडी होऊ नये व परिसरातील वाहतूक सुरळीत व सुनिश्चित राहणे आम जनतेच्या सोईसाठी आवश्यक आहे.

**त्याअर्थी,** मी, **पंकज शिरसाट, पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर** म्हणून, मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम.व्ही.ए.–११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसुचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१) (अ) (ब) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून पुढीलप्रमाणे अधिसूचना जारी करीत आहे. :–

**प्रवेश बंद –** मदन ठाकरे चौक, फडके रोड येथुन लो. टिळक रोडवरील ताई पिंगळे चौकाच्या दिशेने जाणाऱ्या वाहणांना **मदन ठाकरे चौक** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** सदरची वाहने मानपाडा रोड, सावरकर रोड, गणेश मंदिर रोड, शहिद भगतसिंग मार्गने ईच्छीत स्थळी जातील.

**एक दिशा मार्ग –** ताई पिंगळे चौक, टिळक रोडवरून फडके रोडच्या दिशेने जाणाऱ्या वाहनांना एकदिशा मार्ग सुरू राहिल.

**सदरची अधिसुचना दि. ०७/१०/२०२५ रोजी पासुन रोडचे काम पुर्ण होई पर्यंत अंमलात राहील.**

सदर वाहतूक नियंत्रण अधिसूचना पोलीस वाहने, फायर ब्रिगेड, रुग्णवाहिका, ग्रीन कॉरीडोर, ऑक्सिजन गॅस वाहने व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनांना लागू राहणार नाही.

**( पंकज शिरसाट )**
पोलीस उप आयुक्त,
वाहतूक विभाग, ठाणे शहर.

**प्रति,**

जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय, ठाणे.
२/– सदर अधिसूचना प्रसिध्द करण्यास विनंती आहे.

**प्रत माहितीसाठी सविनय सादर,**

मा. पोलीस आयुक्त, ठाणे शहर
मा. पोलीस सह आयुक्त, ठाणे शहर
मा. जिल्हाधिकारी, ठाणे
मा. आयुक्त, ठाणे महानगरपालिका, ठाणे.
मा. अपर पोलीस आयुक्त, पूर्व प्रादेशिक विभाग, कल्याण
प्रादेशिक परिवहन अधिकारी, ठाणे, कल्याण
पोलीस उप आयुक्त, परिमंडळ–३, कल्याण
पोलीस उप आयुक्त, विशेष शाखा, ठाणे
परिवहन व्यवस्थापक, कल्याण–डोंबिवली महानगरपालिका, कल्याण
विभाग नियंत्रण कक्ष, राज्य परिवहन विभाग, ठाणे/कल्याण
नियंत्रण कक्ष, ठाणे/कल्याण शहर
ठाणे पोलीस पत्रक.

**प्रत** :– पोलीस उप आयुक्त, आर्थिक गुन्हे शाखा, ठाणे शहर
२/– सदर अधिसूचना नागरीकांच्या माहितीसाठी ठाणे शहर पोलीस वेबसाईटवर प्रसिध्द होणेस विनंती आहे.

**प्रत** :– समन्वय अधिकारी, ९ ए. एस. कक्ष, ठाणे.
२/– सदर अधिसूचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी.

**प्रत** :– स.पो.आ. कल्याण वाहतूक विभाग/पोनि डोंबिवली वाहतूक उपविभाग.
२/– म.न.पा.कल्याण–डोंबिवली च्या संबंधीत अधिका–यांकडून आवश्यक सूचना फलके लावून घ्यावीत.